# बृहन्मुंबई महानगरपालिका



# महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर

यांना ६६ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त
बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे विनम्र अभिवादन !!

वर्ष - २०२२

# महापरिनिर्वाण दिनानिमित्त बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे देण्यात येणाऱ्या महत्त्वाच्या नागरी सेवा-सुविधा

- **ऑनलाईन प्रक्षेपण पुढील समाज माध्यम लिंकवर उपलब्ध :** १. https://bit.ly/6december2022YT
  २. https://bit.ly/6december2022FB ३. https://bit.ly/6december2022TT
- **ऑनलाईन थेट प्रक्षेपणामुळे अनुयायांना आपापल्या घरी राहून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करता येणार.**
- **चैत्यभूमी स्मारक येथे शासकीय मानवंदना.**
- **चैत्यभूमी स्मारकावर हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी.**

**चैत्यभूमी, छत्रपती शिवाजी महाराज मैदान परिसर व महत्त्वाच्या ठिकाणी देण्यात येणाऱ्या नागरी सेवा-सुविधा**

१) शामियाना व व्ही. आय. पी. कक्षासह नियंत्रण कक्षाची व्यवस्था.

२) नियंत्रण कक्षाशेजारी, तोरणा प्रवेशद्वाराजवळ व सूर्यवंशी सभागृह मार्गासह ११ ठिकाणी रुग्णवाहिकेसहित आरोग्यसेवा.

३) १ लाख चौरस फूट क्षेत्रफळाच्या मंडपात तात्पुरता निवारा.

४) मैदान व परिसरात आणि रांगेत असणाऱ्या अनुयायांसाठी फिरती शौचालये.

५) पिण्याच्या पाण्याच्या नळांची व्यवस्था. रांगेत व परिसरात असणाऱ्या अनुयायांसाठी पिण्याचे पाण्याचे टँकर्स.

६) कर्मचारी व वाहतूक व्यवस्थेमार्फत संपूर्ण परिसरात स्वच्छता.

७) संपूर्ण परिसरात विद्युत व्यवस्था आणि भ्रमणध्वनी चार्जिंगकरीता योग्य ती व्यवस्था.

८) अग्निशमन दलामार्फत आवश्यक त्या सेवांसह चैत्यभूमीलगतच्या चौपाटीवर जीव रक्षकांसहीत बोटीची व्यवस्था.

९) चैत्यभूमीतील आदरांजलीचे मोठ्या पडद्यांवर थेट प्रक्षेपण.

१०) छत्रपती शिवाजी महाराज मैदानात स्टॉल्सची रचना.

११) स्काऊट गाईड हॉल येथे भिक्कू निवासाची व्यवस्था.

१२) मैदानात धुळीचा त्रास रोखण्याकरीता पायवाटांवर आच्छादनाची व्यवस्था.

१३) मैदान व चैत्यभूमी येथे अनुयायांना मार्गदर्शनाकरीता १०० फूट उंचीवर स्थळ निदर्शक फुग्याची व्यवस्था.

१४) तात्पुरत्या स्नानगृहांची व फायबरच्या तात्पुरत्या शौचालयांची व्यवस्था.

१५) इंदू मिलच्या मागे फायबरची शौचालये व स्नानगृहे आदी व्यवस्था.

१६) रांगेतील अनुयायांसाठी तात्पुरते छत व बसण्यासाठी बाकड्यांची व्यवस्था.

१७) महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर माहिती पुस्तिकेचे मोफत वितरण.

१८) डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, वडाळा येथे शौचालये, स्नानगृहे, पिण्याचे पाणी, वैद्यकीय कक्ष आदी व्यवस्था.

१९) दादर (पश्चिम) रेल्वे स्थानकाजवळ आणि दादर (पूर्व) स्वामिनारायण मंदिराजवळ नियंत्रण कक्ष, माहिती कक्ष, फिरती शौचालये, स्नानगृहे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि वैद्यकीय कक्ष.

२०) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे निवासस्थान असणाऱ्या 'राजगृह' येथे नियंत्रण कक्ष आणि वैद्यकीय कक्ष.

२१) एल विभाग - लोकमान्य टिळक टर्मिनस, कुर्ला येथे नियंत्रण कक्ष, आरोग्य सेवा कक्ष व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था

२२) 'एम पश्चिम' विभाग - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान, चेंबूर येथे आवश्यक ती व्यवस्था.

**सेवा - सुविधांबाबत संपर्क :**

| **प्रशांत सपकाळे** | **रमाकांत बिरादार** | **आशीष शर्मा** |
| --- | --- | --- |
| सहाय्यक आयुक्त ('जी उत्तर' विभाग) | उप आयुक्त (परिमंडळ - २) | अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) |
| दूरध्वनी : २४३९ ७८०० | दूरध्वनी : २४१५ ०४०० | दूरध्वनी : २२६२ ०१४९ |



## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर :

**भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार**



# महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांना विनम्र आवाहन

महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दिनांक ६ डिसेंबर १९५६ रोजी दिल्लीत महापरिनिर्वाण झाल्यानंतर मुंबईतील दादर चौपाटी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी लाखोंच्या संख्येने अनुयायी उपस्थित होते.

तद्नंतर प्रत्येक वर्षी ६ डिसेंबर रोजी भारताच्या कानाकोपऱ्यातून लाखोंच्या संख्येने आलेले अनुयायी चैत्यभूमी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासमोर नतमस्तक होतात आणि अभिवादन करतात.

या प्रचंड जनसमुदायासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे दरवर्षी विविध नागरी सेवा- सुविधा पुरविण्यात येतात. या सेवा-सुविधा प्रामुख्याने चैत्यभूमी परिसर व छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथे उपलब्ध करुन देण्यात येतात. या सेवा-सुविधांमध्ये तात्पुरत्या निवाऱ्यासाठी मंडपाची सोय, शौचालये, स्नानगृहे, पिण्याचे पाणी, आरोग्य सेवा, सुरक्षिततेसाठी धातू शोधक, क्लोज सर्किट टिव्ही, चैत्यभूमीजवळील समुद्रात जीवरक्षक बोटी आणि अग्निशमन व नियंत्रण कक्ष सेवा इत्यादींचा समावेश असतो.

विशेष बाब म्हणजे दरवर्षी प्रमाणेच यावर्षी देखील दादर परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज मैदान यासह वडाळा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय आणि लोकमान्य टिळक टर्मिनस (कुर्ला टर्मिनस) येथे देखील तात्पुरत्या निवाऱ्यासह फिरती शौचालये, स्नानगृहे व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

गेल्यावर्षीप्रमाणेच यंदाही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक असलेल्या चैत्यभूमी येथून 'ऑनलाईन' पद्धतीने थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे. या थेट 'ऑनलाईन' प्रक्षेपणामुळे अनुयायांना आपापल्या घरी, स्थानिक परिसरात राहून देखील अभिवादन करता येणार आहे. चैत्यभूमी स्मारक येथे शासकीय मानवंदना दिली जाणार असून स्मारकावर हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे देशासाठी अतुलनीय दिशादर्शक कार्य आहे, त्यांच्या कार्याचा, विचारांचा आणि योगदानाचा सन्मान करण्याचा मान महानगरपालिकेस मिळाला आहे. या अनुषंगाने सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.

| रमाकांत बिरादार | आशीष शर्मा | डॉ. इ सिं चहल |
| --- | --- | --- |
| उप आयुक्त<br>( परिमंडळ - २) | अतिरिक्त महानगरपालिका<br>आयुक्त (शहर) | महानगरपालिका आयुक्त<br>तथा प्रशासक |

# स्वातंत्र्याचा दीपस्तंभ : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न, परमपूज्य, बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमीवर अभिवादन करण्यासाठी दरवर्षी अनुयायांचा महासागर उसळतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित होवून, त्यांनी दाखवलेल्या मार्गावर चालणारी अगणित माणसं, अनुयायी चैत्यभूमीवर नतमस्तक होताना पाहिले की, डॉ. बाबासाहेबांचे विचार-कार्य वैश्विक आहे, याची प्रचिती वारंवार येते. थोर व्यक्तिंच्या स्मृतिंसमोर नतमस्तक होताना मिळणारी ऊर्जा तितकीच प्रेरकही असते. ही ऊर्जा घेवून परतणारे अनुयायी डॉ. बाबासाहेबांच्या विचारांना, कार्याला सर्वत्र पोहोचवतात आणि हे चक्र मागील सहा दशकांहून अधिक काळ निरंतर सुरु आहे. भारतमातेचे थोर सुपुत्र असणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त मी आदरपूर्वक अभिवादन करतो.

अलीकडेच भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत असताना डॉ. बाबासाहेबांनी देशाच्या उत्थानासाठी दिलेल्या योगदानाचे सर्वांनी पुनःस्मरण केले आहे. स्वातंत्र्योत्तर कालावधीत भारतीय संविधानाच्या रुपाने डॉ. बाबासाहेबांचे कार्य अखंडपणे देशाच्या सोबत राहणारे आहेच, पण स्वातंत्र्यपूर्व कालावधीत देखील त्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये अफाट कर्तृत्व गाजवले होते. विशेषतः सामाजिक पातळीवर त्यांनी सर्वांनाच प्रभावित केले होते. डॉ. बाबासाहेबांची स्वातंत्र्याची संकल्पना तर इतकी व्यापक होती की, त्यात संपूर्ण विश्व सामावून जावे. हक्क हाच स्वातंत्र्याचा आधार असतो, असे मानणारे डॉ. बाबासाहेब हे उपेक्षितांच्या हक्कांबद्दल आग्रही असले; तरी संपूर्ण देश स्वातंत्र्य युद्धात लोटला असताना 'एक राष्ट्र-एक लोक' ही भावना असणे आवश्यक आहे, असे ते नेहमी म्हणायचे. ब्रिटिश सरकारच्या विरोधात परखडपणे मते मांडत असतानाच, देशभक्ती म्हणजे संपूर्ण देशातील प्रत्येक घटकाचा संपूर्ण विकास इतके साधे तत्त्व सांगून त्यांनी जनतेला संघटित होण्याची प्रेरणा दिली.

स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही त्यांनी सांगितलेली तत्त्वे जपूनच आमच्या लोकशाही व्यवस्थेची बांधणी झाली, ती टिकली आणि आजही दिवसागणिक मजबूत होते आहे. ही चारही तत्त्वे किती महत्त्वाची आहेत, हे आता नव्याने सांगण्याची आवश्यकता नाही. जगभरातील विविध देशांमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या सत्ता आणि व्यवस्था अस्तित्वात आहेत. त्यापैकी 'लोकशाही' व्यवस्था ही सर्वात उजवी ठरली आहे. त्यातही 'भारतीय लोकशाही' ही इतर लोकशाहीप्रधान देशांना मार्गदर्शक आणि अचंबित करणारी ठरली आहे. कारण, लोकशाही व्यवस्था टिकण्यासाठी एकाच संस्कृतीचा समाज आवश्यक आहे, हा परंपरागत समज खोटा ठरवण्याचे काम भारताने करुन दाखवले आहे. वैविध्यपूर्ण संस्कृती, वेगवेगळ्या जाती-धर्म, निरनिराळ्या समाज व्यवस्था, विविध भाषिक लोक हे एकाच देशामध्ये गुण्यागोविंदाने नांदू शकतात, आपल्या देशाला बलशाली करु शकतात; हे भारतीयांनी स्वातंत्र्यानंतरच्या पंच्याहत्तर वर्षांमध्ये खणखणीतपणे सिद्ध करुन दाखवलं आहे. संविधानाने आखून दिलेल्या चौकटीत, प्रजासत्ताक पद्धतीने भारताची वाटचाल समर्थपणे सुरु आहे. त्यासाठी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आजही राज्यघटनेच्या माध्यमातून दीपस्तंभ बनून आपल्याला मार्गदर्शन करत आहेत.

देशाच्या स्वातंत्र्यासाठी अगणित लोकांनी आपले आयुष्य समर्पित केले, लाखो लोकांनी बलिदान दिले, कित्येकांनी घरावर तुळशीपत्र ठेवले. अशा असंख्य अनामवीरांच्या बलिदानामुळे आपण आज स्वातंत्र्य उपभोगत आहोत, याची जाणीव स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करताना सर्वांनाच प्रकर्षाने झाली. भारतीय प्रशासकीय सेवेत सुमारे ३३ वर्षांची सेवा बजावताना व सरकारच्या वतीने लोकहिताची कामे करताना प्रशासकीय, सामाजिक, आर्थिक, धोरणात्मक अशा सर्वच अंगांनी भारतीय लोकशाही व्यवस्था अत्यंत खोलात समजून घ्यायची मला संधी मिळाली. सेवा बजावताना काही वेळा अडचणी देखील पाहिल्या. दरवेळी अशा अडचणी सोडवताना आमच्या सारख्या प्रशासकीय अधिकाऱ्यांसमोर निदान कोणते ना कोणते कायदे, नियम, धोरण इत्यादींच्या स्वरुपात मार्गदर्शन नजरेसमोर असते. त्यामुळे अडचणीतून मार्ग निघतो. अशावेळी एक विचार हमखास मनात येतो की, भारतीय राज्यघटनेची निर्मिती करताना कोणते आव्हान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासमोर नव्हते ? अक्षरशः शून्यातून नवीन विश्व घडवावे, अशी स्थिती होती. मात्र काळाच्या कितीतरी पुढे पाहून, विचार करुन त्यांनी भारतासारख्या वैविध्यपूर्ण देशासाठी भारतीय राज्यघटना तयार केली.

पारतंत्र्यातून बाहेर पडलेल्या देशासमोर उभारी घेण्याचे आव्हान, परकीयांनी केलेल्या सांपत्तिक लुटीमुळे हलाखीच्या स्थितीत असलेल्या मायभूमीला समृद्धीची दिशा देण्याचे आव्हान, सामाजिक व धार्मिक स्थित्यंतरातून जात असलेल्या समाजरचनेमध्ये सलोखा पेरण्याचे अत्यंत कठीण लक्ष्य, तब्बल पावणेदोनशे वर्षांची गुलामगिरी सहन केलेल्या मानसिकतेला नागरिकत्वाची, कायदा-सुव्यवस्थेची नागरी संस्कृती समजावून देत ती अंगीकारण्यासाठी तयार करण्याचे आव्हान आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे राजे, साम्राज्ये-संस्थाने, परकीय सत्ता यांचाच इतिहास ठाऊक असलेल्या जनतेला 'देश' म्हणून लोकशाही नावाच्या एका नवीन धाग्यात बांधणे, प्रजा हीच सार्वभौम ठरवून लोकांनी निवडलेल्या प्रतिनिधींचे 'सरकार' लोकांसाठीच काम करेल, अशी व्यवस्था उभी करण्याचे आव्हान अशी शेकडो आव्हाने त्यावेळी होती. त्यासाठी संविधान नावाची काळाच्या अडथळ्यांवर मात करु शकणारी प्रणाली बनवून देताना डॉ. बाबासाहेबांनी अथक परिश्रम घेतले. त्याप्रसंगी त्यांनी कौतुकाप्रमाणेच टीका देखील उदारतेने स्वीकारली. मात्र 'संविधान' नावाचे महाकाव्य भारताच्या नवनिर्मितीला सार्वभौमत्वाच्या आधारे आणि लोकशाही व्यवस्थेच्या माध्यमातून आकार देईल, याबद्दल त्यांच्या मनात तसूभरही शंका नव्हती. असा दृढ आत्मविश्वास सहस्रकांमधून एखाद्याकडेच असतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा आत्मविश्वासाचे धनी होते. अर्थशास्त्रज्ञ, वकील, समाजोद्धारक, विविध विषयांचे व्यासंगी, शिक्षण सुधारक, परिपक्व राजकारणी, सिद्धहस्त लेखक, पत्रकार, प्रेरक वक्ता, भविष्यवेधी चिंतक अशा कितीतरी रुपांमध्ये त्यांना तत्कालीन समाजमनाने अनुभवले. त्यांचे विचार, कार्याचा प्रभाव आजही कायम आहे आणि यापुढेही कायम राहील. स्वातंत्र्याच्या अलीकडे आणि पलीकडे अशा दोन्ही कालावधीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा हा जो अमीट ठसा आहे, त्यामुळेच ते स्वातंत्र्याचे दीपस्तंभ ठरतात.

इंग्रजांच्या आर्थिक धोरणातून भारतीयांची पिळवणूक होत आहे, याचे विश्लेषण करणारा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा 'दि प्रॉब्लेम ऑफ दी रुपी' हा ग्रंथ १९२२ मध्ये ब्रिटिश परीक्षकांनी नाकारला होता. याच ग्रंथाबद्दल पुढे जावून त्यांना 'डॉक्टर ऑफ सायन्स' ही पदवी मिळाली. या ग्रंथातील बाबासाहेबांचे विचार पाहता सुप्रसिद्ध राज्यशास्त्रज्ञ प्रो. हॅराल्ड लास्की यांनी 'खऱ्या अर्थाने विद्रोही' अशी उपाधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना दिली होती. सन १९३० मध्ये लंडनमध्ये भरलेल्या गोलमेज परिषदेत तर त्यांनी ब्रिटिश सरकारची कानउघाडणी करुन आपला निर्भिडपणा दाखवून देत स्वातंत्र्य तत्त्वाचे ज्वलंत उदाहरणच दाखवून दिले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची थोरवी शब्दांमध्ये व्यक्त करणे कधीही, कोणालाही शक्य होणारे नाही! एका माणसाच्या विचारांचा, कार्याचा वारसा पुढे नेणारा अनुयायांचा महासागर तयार होतो, वर्षोनुवर्षे हा महासागर विस्तारत जातो, असे उदाहरण जगाच्या पाठीवर खूप कमी ठिकाणी आढळते. कारण काळाची पावले उमटत जातात, तशी विचारांची दिशा, कामाची दशा धूसर होत जाते. मात्र डॉ. बाबासाहेब ह्याला अपवाद आहेत, हे चैत्यभूमीवर दिसून येते. बाबासाहेबांच्या स्मृती स्मारकावर येणाऱ्या लाखो अनुयायांसाठी आवश्यक व पुरेशा नागरी सेवा-सुविधा पुरविण्याचा प्रामाणिक प्रयत्न बृहन्मुंबई महानगरपालिका कित्येक वर्षांपासून करीत आहे. यंदाही या सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मनोभावे अभिवादन करतानाच त्यांच्या संकल्पनेतील समृद्ध भारतदेश उभारणीचे बळ आपणा सर्वांनाच मिळो, अशी सदिच्छाही व्यक्त करतो!

**डॉ. इ सिं चहल**
**महानगरपालिका आयुक्त**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट

१८९१ : महू, मध्यप्रदेश येथे सैनिक छावणीत जन्म (१४ एप्रिल).
१९०७ : डॉ.आंबेडकरांनी मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण केली.
१९०८ : रमाबाई वलंगकर यांच्यासोबत विवाह.
१९१० : इन्टरमीडिएट परीक्षा उत्तीर्ण.
१९१२ : बी. ए. परीक्षा उत्तीर्ण.
१९१३ : वडील सुभेदार रामजी यांचे निधन (२ फेब्रुवारी).
१९१३ : सयाजीराव गायकवाड यांनी विदेशात अध्ययनासाठी शिष्यवृत्ती बहाल केली (१ जून).
१९१३ : उच्च शिक्षणाकरीता न्यूयॉर्क (अमेरिका) येथे रवाना.
१९१५ : 'ॲन्शंट इंडियन कॉमर्स' या प्रबंधावर एम. ए. ची उपाधी बहाल.
१९१६ : 'नॅशनल डिविडंड ऑफ इंडिया : ए हिस्टॉरिकल अँड अनालिटिकल स्टडी' प्रबंध कोलंबिया विद्यापीठाद्वारे स्वीकृत.
१९१६ : पीएच. डी. पदवी बहाल.
१९१८ : सिडेनहॅम कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्रोफेसर म्हणून नियुक्ती (११ नोव्हेंबर).
१९२० : राजर्षी शाहू यांच्या साहाय्याने 'मूकनायक' पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित (३१ जाने.)
१९२० : माणगाव (कोल्हापूर) येथे बहिष्कृत परिषदेचे अध्यक्षपद (१ मार्च).
१९२० : अखिल भारतीय बहिष्कृत परिषद, नागपूर (१ मे).
१९२२ : बॅरिस्टरची परीक्षा उत्तीर्ण.
१९२३ : 'डॉक्टर ऑफ सायन्स'ची पदवी बहाल.
१९२४ : 'बहिष्कृत हितकारिणी सभा' ची स्थापना, मुंबई (२० जुलै).
१९२६ : 'राजरत्न' या मुलाचे निधन (जुलै).
१९२७ : कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद, महाड (१९ मार्च).
१९२७ : 'बहिष्कृत भारत' पाक्षिकाचे प्रकाशन (३ एप्रिल).
१९२७ : मुंबई विधिमंडळात सदस्य म्हणून निवड.
१९२७ : 'समाज समता संघ' ची स्थापना (४ सप्टेंबर).
१९२७ : डॉ. आंबेडकरांचे ज्येष्ठ बंधू बाळाराम आंबेडकर यांचे निधन (१२ नोव्हेंबर).
१९२७ : अमरावती येथे अंबादेवी मंदिर सत्याग्रह (१३ नोव्हेंबर).
१९२७ : महाडचा सत्याग्रह आणि मनुस्मृती दहन (२५ डिसेंबर).
१९२८ : मुंबई येथे सरकारी विधी महाविद्यालयात प्राध्यापक (जून).
१९२८ : 'समता' पाक्षिकाचा आरंभ (२९ जून).
१९२८ : 'सायमन कमिशन' पुढे साक्ष (२३ ऑक्टोबर).
१९२९ : अस्पृश्यांसाठी ३३ टक्के आरक्षण ठेवण्याबाबत मुंबई विधिमंडळात भाषण.
१९३० : काळाराम मंदिर, नाशिक सत्याग्रह प्रारंभ (३ मार्च).
१९३० : लंडन येथे गोलमेज परिषदेसाठी मुंबईहून रवाना (२ ऑक्टोबर).
१९३० : गोलमेज परिषदेत अस्पृश्यांची बाजू ठामपणे मांडली (नोव्हेंबर).
१९३० : 'जनता' साप्ताहिकाचा आरंभ (२४ नोव्हेंबर).
१९३१ : मणीभवन, मुंबई येथे गांधीजींसोबत पहिली भेट (१४ ऑगस्ट).
१९३१ : अल्पसंख्याकांच्या प्रश्नाबाबत गांधीजींच्या धोरणाला गोलमेज परिषदेत विरोध (८ ऑक्टोबर).
१९३१ : गांधी-आंबेडकर-पंचम जॉर्ज यांची भेट (२६ नोव्हेंबर).
१९३२ : पुणे करारावर स्वाक्षरी (२४ सप्टेंबर).
१९३५ : पत्नी रमाबाई यांचे निधन (२७ मे).
१९३५ : मुंबई विधि महाविद्यालयाच्या प्राचार्य पदावर नियुक्ती (२ जून).
१९३५ : येवला, 'हिंदू म्हणून जन्माला आलो, पण हिंदू म्हणून मरणार नाही.' डॉ. आंबेडकरांची धर्मांतराची घोषणा (१३ ऑक्टोबर).

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट

१९३६ : 'जातीप्रथेचे उन्मूलन' भाषण प्रकाशित (मे).
१९३६ : 'मुक्ती कोन पथे' विख्यात भाषण, मुंबई (३१ मे).
१९३६ : स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना (१५ ऑगस्ट).
१९३७ : मुंबई असेंब्ली निवडणूक, डॉ.आंबेडकर विजयी (१७ फेब्रुवारी ).
१९३७ : कोकणातील 'खोती' नष्ट करण्याकरीता मुंबई विधिमंडळात विधेयक मांडले (१७ सप्टेंबर).
१९३८ : पंढरपूर, मातंग परिषदेतर्फे मानपत्र अर्पण (४ जानेवारी).
१९३८ : मनमाड येथे अस्पृश्य रेल्वे कामगार परिषद (१२-१३ फेब्रुवारी ).
१९३८ : मुंबई विधि महाविद्यालयाच्या प्राचार्य पदाचा राजीनामा (मे).
१९३८ : औद्योगिक कलहाचे विधेयक मुंबई विधिमंडळात मांडले (सप्टेंबर ).
१९३८ : स्वतंत्र मजूर पक्षातर्फे सत्याग्रह (७ नोव्हेंबर).
१९३९ : महाड, शेतकरी परिषदेचे अध्यक्षपद - काँग्रेसच्या शेतकरी - विरोधी धोरणावर टीका (जानेवारी).
१९४० : सुभाषचंद्र बोस यांच्यासोबत भेट, मुंबई (२२ जून).
१९४० : 'थॉट्स ऑन पाकिस्तान' ग्रंथाचे प्रकाशन.
१९४२ : अखिल भारतीय शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना (एप्रिल).
१९४२ : भारतीय दलित वर्ग परिषद, नागपूर येथे हजर (१९ जुलै).
१९४२ : मजूर मंत्री म्हणून निवड.
१९४३ : पुणे येथे विख्यात भाषण; 'रानडे, गांधी आणि जिन्ना' (१९ जानेवारी).
१९४५ : 'काँग्रेस आणि गांधींनी अस्पृश्याप्रति काय केले' ग्रंथ प्रकाशित (जून ).
१९४६ : मुंबई येथे सिद्धार्थ महाविद्यालयाची स्थापना (२० जून).
१९४६ : 'शूद्र पूर्वी कोण होते ?' हा ग्रंथ प्रकाशित.
१९४६ : भारताला कोणतीही शक्ती एकात्मक होण्यापासून परावृत्त करु शकत नाही. संविधान सभेत भाषण (१७ डिसेंबर ).
१९४७ : भारताचे पहिले कायदे मंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश (ऑगस्ट ).
१९४७ : संविधान मसुदा समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती (२९ ऑगस्ट ).
१९४८ : डॉ. शारदा कबीर यांच्यासोबत विवाह (१५ एप्रिल).
१९४८ : 'दि अनटचेबल्स' ग्रंथ प्रकाशित (ऑक्टोबर).
१९४८ : घटनेचा मसुदा घटना समितीसमोर ठेवला (४ नोव्हेंबर).
१९४९ : घटना समितीत देशभक्तीने ओथंबलेले समारोपीय भाषण (२५ नोव्हेंबर).
१९४९ : घटना समितीने घटना स्वीकार केली (२६ नोव्हेंबर).
१९५० : 'बुद्ध आणि त्यांच्या धम्माचे भवितव्य' लेख महाबोधी संस्थेच्या मासिकात प्रसिद्ध (मे).
१९५० : कोलंबोत विश्व बौद्ध परिषदेला उपस्थित (२५ मे).
१९५० : औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय स्थापन (१९ जून ).
१९५१ : लोकप्रतिनिधीत्व विधेयक लोकसभेपुढे मांडले (मे ).
१९५१ : 'हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती' हा लेख महाबोधी मासिकामध्ये प्रकाशित (सप्टेंबर ).
१९५१ : हिंदू कोड बिल व मागासवर्गीयांच्या आरक्षणाबाबत मंत्रिपरिषदेचा राजीनामा (२७ सप्टेंबर).
१९५२ : प्रथम सार्वत्रिक निवडणुकीमध्ये पराभव (जानेवारी ).
१९५२ : राज्यसभेसाठी निवड (मार्च ).
१९५२ : कोलंबिया विद्यापीठातर्फे 'डॉक्टर ऑफ लॉज्' ही पदवी अर्पण (५ जून ).

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट

१९५३ : हैद्राबाद, उस्मानिया विद्यापीठातर्फे 'डॉक्टर ऑफ लिटरेचर' पदवी अर्पण (१२ जानेवारी ).

१९५४ : 'महात्मा फुले' या चित्रपटाच्या मुहूर्त समारंभास उपस्थित (३० जानेवारी).

१९५४ : भंडारा पोटनिवडणुकीमध्ये पराभव (मे).

१९५४ : आकाशवाणीवर 'माझे वैयक्तिक तत्त्वज्ञान' भाषण (३ ऑक्टोबर).

१९५४ : माझे आयुष्य तीन गुरुंनी आणि तीन उपास्य दैवतांनी घडले (२८ ऑक्टोबर ).

१९५४ : रंगून, तिसऱ्या जागतिक बौद्ध परिषदेला उपस्थित (डिसेंबर).

१९५५ : भारतीय बौद्ध महासभा स्थापित (४ मे ).

१९५६ : मुंबई ही महाराष्ट्राची आहे, अशी ताकीद भारत सरकारला दिली (४ फेब्रुवारी).

१९५६ : 'ऑक्टोबर महिन्यात मी बौद्धधर्माची दीक्षा घेईन' अशी घोषणा नरेपार्क, मुंबई येथे केली (२४ मे).

१९५६ : नागपूर येथे पूज्य भंते महास्थवीर चंद्रमणी यांच्या हस्ते पत्नीसोबत धम्मदीक्षा घेतली व नंतर आपल्या ५ लाख अस्पृश्य बंधूंना बौद्ध धम्माची दीक्षा दिली (१४ ऑक्टोबर).

१९५६ : 'बौद्ध धम्म हा स्वीकारला' याविषयी सकाळी अभूतपूर्व भाषण व नागपूर म्युनिसिपालिटीतर्फे संध्याकाळी मानपत्र अर्पण (१५ ऑक्टोबर).

१९५६ : चंद्रपूर येथे २ लाख अस्पृश्य बंधूंना धम्मदीक्षा दिली (१६ ऑक्टोबर).

१९५६ : काठमांडू, नेपाळ येथे जागतिक बौद्ध परिषदेत 'बुद्ध आणि कार्ल मार्क्स' हे अभूतपूर्व भाषण दिले (२० नोव्हेंबर).

१९५६ : दिल्ली येथे त्यांच्या निवासस्थानी महापरिनिर्वाण (०६ डिसेंबर ).

१९५६ : मुंबई येथे दादर चौपाटीच्या किनाऱ्यावर १० लाख लोकांच्या साक्षीने बौद्ध पद्धतीनुसार अंतिम संस्कार (७ डिसेंबर).





" तुम्ही सर्वांनी - स्त्रीपुरुषांनी - खात्री बाळगली पाहिजे की तुमचा उद्धार करण्यास दुसरे कोणीही येणार नाही, किंवा तो मीही करणार नाही. जर मनात आणाल तर तुमचा उद्धार तुम्हीच करुन घेण्यास समर्थ व्हाल "

# बाबासाहेबांचे तीन गुरु



तथागत गौतम बुद्ध



संत कबीर



महात्मा जोतिबा फुले

'' माझे आयुष्य तीन गुरु आणि तीन उपास्य दैवतांनी घडले आहे. माझे पहिले आणि श्रेष्ठ गुरु 'बुद्ध' होत. माझे दुसरे गुरु 'कबीर' आणि तिसरे गुरु म्हणजे 'जोतिबा फुले' होत... माझी तीन उपास्य दैवतेही आहेत. पहिले दैवत 'विद्या', दुसरे दैवत 'स्वाभिमान' आणि तिसरे दैवत म्हणजे 'शील' होय'' (मुंबई, १९५४).

-डॉ. बाबासाहेब आंबेडकर

'' जातिभेदावर कुऱ्हाड घालून अस्पृश्यतेचे पाप मुळातच मारुन टाकणारा जर एखादा धर्मवीर आपल्या देशात अवतरला असेल तर तो एकटा गौतम बुद्धच होय.''

# बाबासाहेबांचे महानिर्वाण

**भारताच्या राजकीय, सामाजिक वैचारिक क्षितिजावर प्रखर तेजाने चमकणारे, आपल्या ज्ञानगंगेने अस्पृश्यांप्रमाणेच स्पृश्यांनाहि पुनीत करणारे भारताचे तपोनिधि व भारताच्या राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे दिल्ली येथील त्यांच्या निवासस्थानी निद्रावस्थेतच देहावसान झाल्याचें गुरुवार ता. ०६-१२-५६ रोजी सकाळी सहा वाजता आढळून आले ! ही दु:खद वार्ता कानी पडतांच सारा भारत विव्हळ झाला. भारतातील 'हिंदु समाजातल्या अनिष्ट रुढींविरुद्ध केलेल्या बंडाचे प्रतीक' असे उद्गार डॉ. बाबासाहेबांना श्रद्धांजली वाहताना नेहरुंनी ता. ६-१२-५६ रोजी लोकसभेत काढले.**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पार्थिव देह गुरुवार ता. ६-१२-५६ रोजी रात्रौ सव्वा तीन वाजता सांताक्रूझ विमानतळावर आणण्यात आला. हजारो लोकांनी तेथे त्यांच्या पार्थिव देहाला अभिवादन केले. दुपारी तीन वाजल्यापासून विमानतळावर लोकांची रीघ सुरु होती. तीनच्या सुमाराला सुमारे वीस हजार लोक विमानतळावर हजर होते. ही गर्दी सारखी वाढतच होती. मुंबईत त्यादिवशी दुपारपासूनच रस्त्याच्या दोन्ही बाजूस जागोजाग लोकांचे थवे उभे होते. या सर्वांच्या चेहेऱ्यावर दु:खाची दाट छाया पसरलेली होती. अस्पृश्य समाजातील स्त्रिया तर टाहो फोडून रडत होत्या. 'आता आम्हांला कोण विचारणार ?' या आर्त वाणीने त्या एकमेकींकडे असहायतेने पहात होत्या. बाबासाहेबांच्या देहावसानाची बातमी पसरताच मुंबईच्या बहुतेक सर्व गिरण्यांतून स्वयंस्फूर्तीने कामगार बाहेर पडले व त्यांनी अंत:करणाच्या तळमळीने दुखवटा व्यक्त केला.**

### विमानतळ ते राजगृह

त्यादिवशी पहाटे सांताक्रुझ विमानतळावरुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शव दादर येथील हिंदु कॉलनीतील राजगृह या त्यांच्या निवासस्थानी आणले जात असताना मुंबईतील व उपनगरातील जनतेने त्यांना जी भावनापूर्ण श्रद्धांजली वाहिली तशी यापूर्वी अन्य नेत्यास क्वचितच वाहिली असेल.

विमानातून डॉ. बाबासाहेबांचा पुष्पाच्छादित पार्थिव देह बाहेर काढताच विमानतळावरील डॉ. बाबासाहेबांच्या आप्तेष्ट स्त्रिया ओक्साबोक्शी रडू लागल्या. पुरुष मंडळींनासुद्धा आपले अश्रू आवरणे कठीण झाले. बाबासाहेबांचा पार्थिव देह घेऊन येणारे इंडियन एअर लाईन्स कार्पोरेशनचे खास विमान पहाटे दोन वाजता सांताक्रुझ विमानतळावर उतरले. त्यावेळी विमानतळावर पंचवीस हजार स्त्री-पुरुष उपस्थित होते. डॉ. बाबासाहेबांच्या अखेरच्या दर्शनाची संधी मिळावी म्हणून विमानतळाबाहेरील जागेत त्यांनी दोन रांगा केल्या होत्या. खुद्द विमानतळावर बाबासाहेबांचे आप्तेष्ट व आचार्य मो. वा. दोंदे, बाबासाहेबांचे चिरंजीव यशवंतराव, श्री. बी. सी. कांबळे, श्री. मधु दंडवते. श्री. आर. डी. भंडारे व शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचे आणि पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. विमानातून बाबासाहेबांचे शव बाहेर काढल्यावर त्याला पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे सिद्धार्थ आर्टस व सायन्स कॉलेज, सिद्धार्थ लॉ कॉलेज, सिद्धार्थ कॉमर्स कॉलेज, शेड्युल्ड कास्ट फेडरेशन व भारतीय बौद्ध महासभा यांच्यावतीने पुष्पहार घालण्यात आले. त्यानंतर नगरपालिकेच्या ॲम्ब्लुन्समध्ये शव ठेवण्यात आले व तेथून मूक मिरवणुकीस प्रारंभ झाला.

डोळ्यात अश्रू व हातात फुले सांताक्रुझ विमानतळ ते राजगृह या पाच मैलांच्या रस्त्यावर ठिकठिकाणी दुतर्फा हजारो स्त्री-पुरुष नागरिक त्या दिवशी दुपारपासून आपल्या प्रिय नेत्याला आदरांजली वाहण्यासाठी रात्रीची आणि थंडीची पर्वा न करता उभे होते. डॉ. बाबासाहेबांना घेऊन येणाऱ्या ॲम्ब्युलन्सची वाट पहात अफाट जनसमुदाय कित्येक तास तिष्ठत होता. त्यांच्या डोळ्यात अश्रू आणि हातात फुलें किंवा हार होते. सारा समुदाय अत्यंत शिस्तबद्ध होता. ॲम्ब्युलन्सच्या पुढे पोलिसांची मोटार होती. परंतु, त्या मोटारमधून शिस्त व शांतता राखण्याच्या सूचना दिल्या जाण्यापूर्वीच शिस्त व शांतता राखली जात होती.

बाबासाहेबांचा चेहरा सर्वांना दिसावा म्हणून ॲम्ब्युलन्समध्ये खास प्रकाश योजनेची व्यवस्था करण्यात आली होती. सांताक्रुझ ते दादर हे पाच मैलांचे अंतर एरवी मोटारीने वीस मिनिटात तोडता येते. परंतु, सर्वांना बाबासाहेबांचे अखेरचे दर्शन मिळावे व त्यांना पुष्पांजली वाहता यावी म्हणून ॲम्ब्युलन्सचा वेग अगदी कमी करण्यात आला होता. ॲम्ब्युलन्सने रात्री अडीच वाजता सांताक्रुझ विमानतळ सोडला. परंतु, ती दादरला राजगृहात येईपर्यंत पहाटेचे पाच वाजले. या एकाच गोष्टीवरुन सांताक्रुझ, कुर्ला, सायन, माटुंगा, दादर येथील नागरिक किती मोठ्या संख्येने रस्त्यावर उपस्थित होते त्याची कल्पना येईल.

**" आपल्या स्वावलंबनाच्या चळवळीचा विस्तृत व सर्व ठिकाणी प्रसार होण्यासाठी निदान प्रत्येक प्रांतात आपले एक तरी वर्तमानपत्र पाहिजे "**



### राजगृहातील अंत्य दर्शन

**राजगृहापाशी :** बरोबर पाच वाजून पाच मिनिटांनी ॲम्ब्युलन्स राजगृहापाशी आली. तोपर्यंत तेथे रात्रभर साडेतीन लाख लोक ॲम्ब्युलन्सची वाट पहात बसून होते. बुद्धं सरणं गच्छामिची प्रार्थनाही तेथे सतत चालू होती. ॲम्ब्युलन्स राजगृहापाशी येताच लोकांनी इतकी गर्दी केली की, पाच सात मिनिटे पोलिसांना व समता सैनिक दलाच्या सैनिकांना ती आवरणे अशक्य झाले. तथापि, नेत्यांच्या विनंतीस मान देऊन सर्वांनी पूर्ववत शिस्त शांतता स्थापन केली. बरोबर सव्वापाच वाजता मेणबत्त्यांच्या मंगल प्रकाशात व उद्बत्त्यांच्या सुवासात डॉ. बाबासाहेबांचे शव ॲम्ब्युलन्समधून उतरविण्यात आले. त्यावेळी तेथे असलेले लाखो लोक धाय मोकलून रडत होते. अर्ध्या तासानंतर डॉ. बाबासाहेबांच्या पार्थिव देहाचे दर्शन घेण्याची जनतेस मुभा देण्यात आली. विमानतळावर उपस्थित असलेल्या हजारो लोकांपैकी अनेक लोक चालत आले होते. दुपारी तीन वाजल्यापासून ते विमान येईल म्हणून लोक वाट पहात होते. विमानतळावरील एक हमाल म्हणाला, ''आज खरोखर माझी ड्युटी नाही. परंतु, बाबांचे शेवटचे दर्शन जवळून घेण्याची संधी मिळावी म्हणून मी ड्युटीवरचा पोशाख घालून आलो आहे.'' विमानतळावरील दुसरा एक अधिकारी म्हणाला, ''आपल्या आवडत्या पुढाऱ्याचे अखेरचे दर्शन मिळावे म्हणून बारा- बारा तास वाट पाहणारे अनुयायी ज्याला लाभतात त्यांच्या लोकोत्तरपणाला तुलनाच नाही.''

'राजगृहा'च्या पाश्चिमाभिमुखसज्जांत बाबासाहेबांचे शव ठेवण्यासाठी एक शामियाना उभारण्यात आला होता. या शामियान्यात पुष्पशय्येवर पार्थिव देह ठेवण्यात आला. त्यांच्या उशाकडील बाजूला बाबांचे पुतणे मुकुंदराव व बाबांच्या भगिनी बसल्या होत्या आणि पायालगत यशवंतराव व दलित फेडरेशनचे नेते उभे होते. दर्शनोत्सुक जनतेला थोपविताना 'समता दला' च्या सैनिकांना अतिशय जड जात होते. पोलिसांच्या पलटणीही लोकांना आटोक्यात आणण्यासाठी धडपडत होत्या. परंतु, शोकावेगाने अनावर झालेल्या या दलित बंधुभगिनींना काबूत आणणे कठीण जात होते. आदल्या दिवशी दुपारपासून तिष्ठत असलेल्या आणि क्षणाक्षणाला वाढत चाललेल्या त्या प्रचंड जनसमुदायाचा धीर आता सुटला होता. अक्षरशः ओक्साबोक्शी रडत हे स्त्री-पुरुष 'राजगृहा' च्या कुंपणावर लोटत होते. तरीसुद्धा 'राजगृहा' भोवतालच्या परिसरात एवढीही गोंधळ गर्दी आढळून येत नव्हती. 'समता सैनिक दला' च्या सैनिकांनी शेवटी लोकांच्या रांगा करण्यात यश मिळविले. या रांगा मध्य रेल्वेच्या दादर स्टेशनपासून रुइया महाविद्यालयाला वळसा घालून 'राजगृहा' च्या प्रवेशद्वारापाशी पोहोचल्या होत्या.

जगातल्या कोणत्याहि सामर्थ्यापेक्षा, राज्यसत्तेपेक्षांहि मानवी अंतःकरणातल्या भावना किती शक्तिमान, तेजस्वी व स्थलकालाची, अंतराची बंधने जुमानत नसतात याचे प्रत्यंतर मुंबईच्या जनतेला ता. ७-१२-१९५६ ला दिसून आले. बाबासाहेबांच्या परिनिर्वाण प्रसंगी निर्वाण यात्रेसाठी जो **दहा लाखांचा** जनसागर त्यादिवशी गोळा झाला होता त्याने काही तास तरी मुंबईचे सारे यांत्रिक जीवन स्थगितच केले होते. ज्या ज्या भागातून मिरवणूक गेली त्या त्या भागांतले सारे व्यवहार बंद पडले होते. महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांतून माणसे धावत आली होती.

एखाद्या नदीला पुराचा लोंढा यावा त्याप्रमाणे लोकांच्या झुंडी रस्त्यावरून धावताना दिसत होत्या. जनसागराच्या भावनांचे जे विराट दर्शन दादर चौपाटीच्या परिसरात पहायला मिळाले, ते पाहिल्यानंतर ही भावनांची शक्ति जगातल्या कोणत्याहि अन्यायी शक्तिपुढे कधीच मान तुकवणार नाही याचा साक्षात्कार सर्वांना झाला.

(दैनिक 'मराठा'तील हा वृत्तांत प्रबुद्ध भारत : 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण विशेषांक' १९५७ वरून साभार)

**'' स्वर्गात तुम्हाला चांगली स्थिती प्राप्त होण्यासाठी माझे प्रयत्न नाहीत व ते माझे कामही नाही. या लोकीचेच तुमचे क्लेश कमी व्हावेत व तुम्हाला सुख प्राप्त व्हावे, असे माझे प्रयत्न आहेत ''.**




स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

" आपण आपले हक्क प्रस्थापित करण्याकरिता चढाईचे धोरण स्वीकारले पाहिजे "






डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची स्वाक्षरी



बृहन्मुंबई महानगरपालिका सभागृहातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अर्धपुतळा

‘‘ आपणास कराव्या लागणाऱ्या पैशाचा विनियोग अनाठायी करण्यापेक्षा स्वतःच्या कुटुंबाच्या पोषणाकडे, समाजाकडे व विशेषतः गरीब विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे करणे खरे हिताचे ठरेल. तसेच अनीती किंवा दुर्व्यसनाचा फैलाव न होण्याकडे सर्वांनी विशेष लक्ष पुरवावे.’’



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दादर (मुंबई) येथील 'राजगृह' या निवासस्थानी बाबासाहेबांनी वापर केलेले टेबल, खुर्ची, चष्मा व हातकाठ्या.



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे निवास असलेली मुंबईतील परळ येथे बी. आय. टी. चाळ इमारत क्र. १



'' लोकांच्या दारिद्र्याचे कारण उत्पादनातील कमतरता हे आहे आणि जे उत्पादन होते त्याचीही समान वाटणी होत नाही. ''



मुंबईच्या हिंदू कॉलनीतील 'राजगृह' निवासस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कुटुंबीय.
डावीकडून यशवंत(मुलगा), डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पत्नी रमाबाई आंबेडकर,
वहिनी लक्ष्मीबाई (आनंदराव यांच्या पत्नी), मुकुंदराव(पुतण्या) आणि त्यांचा आवडता श्वान टॉबी.
राजगृहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर फेब्रुवारी १९३४ मध्ये राहावयास आले.



प्रत्यक्षात धर्मांतर करण्यापूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देहू (जिल्हा पुणे) येथे नव्याने बांधलेल्या बुद्ध विहारात स्वतः आणलेल्या बुद्ध मूर्तीची प्रस्थापना केली. त्याप्रसंगी मूर्तीसह डॉ. बाबासाहेब आंबेडकर व डॉ. माईसाहेब आंबेडकर (२५ डिसेंबर,१९५४)

'' ईश्वरासंबंधी विचार करु नका. आपले वाईट झाले ते इतर लोकांनी आपला स्वार्थ साधला व आपले नुकसान केले म्हणून, गेल्या जन्मातील पातकामुळे नव्हे ''



भारताचे व्हाईसरॉय लॉर्ड वेव्हेल यांच्या मंत्रिमंडळातील सहका-यांसमवेत
मजूरमंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर.



२६ जानेवारी, १९५० रोजी स्वतंत्र भारताची नवी राज्यघटना अंमलात आली.
तत्पूर्वी २६ जानेवारी रोजी गव्हर्नर राजगोपालाचारी यांना समारंभपूर्वक निरोप देण्यात आला.
त्याप्रसंगी घेतलेल्या छायाचित्रात पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु,वल्लभभाई पटेल,
डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी, कायदेमंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर व इतर मंत्रिगण.

'' नवीन हक्क, मोठ्या नोकऱ्या वगैरे मिळवायच्या, तर त्याला स्वतःची लायकी लागत असते. ती लायकी वाढविण्याचे मुख्य काम विद्यार्थी दशेत तुम्ही करीत असताना तुम्ही इतर कोणत्याही चळवळीत पडणे चुकीचे होईल ''



सर स्टॅफर्ड क्रिप्स यांचे अध्यक्षतेखाली 'कॅबिनेट मिशन' पुढे शे. का. फे. च्या वतीने अस्पृश्यांची बाजू मांडण्यासाठी गव्हर्नमेंट हाऊस, दिल्ली येथे जात असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर ( एप्रिल - १९४६)




मजूरमंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी खाणकामगारांच्या वस्तीला भेट देऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.



घटना समितीने नेमलेल्या घटना मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र भारताच्या घटनेचा अंतिम मसुदा हा घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांना सुपूर्द केला, तो ऐतिहासिक क्षण (२५ नोव्हेंबर १९४९ )

'' हिंदुस्थानातील बहुजन समाज राजकारणापासून अलग राहिल्यामुळे आज देशास दुर्दशा प्राप्त झाली आहे. तरी त्या चुकीची पुनरावृत्ती आपण न करता अत्यंत जागरुकतेने पुढील कार्यक्रम आखला पाहिजे ''

## भारताचे संविधान

### उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक,**
भारताचे एक सार्वभौम
**समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य**
घडविण्याचा व त्याचा सर्व नागरिकांस :
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय,** विचार,
अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे
**स्वातंत्र्य ;** दर्जाची व संधीची **समानता ;**
निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये
व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करुन ;
**आमच्या संविधानसभेत** आज दिनांक
२६ नोव्हेंबर, १९४९ रोजी **याद्वारे हे**
**संविधान अंगीकृत आणि अधिनियमित**
**करुन स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**



BHIMRAO R. AMBEDKAR
M.A., Ph.D., D.Sc.
BARRISTER-AT-LAW.

"RAJGRAHA"
DADAR
BOMBAY-14.

ESTATES & LAND MANAGEMENT OFFICE
28. FEB. 1939
BOMBAY MUNICIPALITY.

28.2.39
203

To
The Estate Agent & Land Manager,
Bombay Municipality

Sir,

Please accept the accompanying cheque for Rs 136-0-0 in respect of groundrent for Dadar Matunga Estate Plot No. 129 (South) and oblige. I am sorry for the delay.

Rs 136/0/0

Yours faithfully
B R Ambedkar

PAID
Delivered & Posted
7-3-39

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेला लिहिलेले पत्र

BHIMRAO R. AMBEDKER
M. .G. D.D. Sc. BAR-AT-LAW.
.. LEGISLATIVE COUNCIL, BOMBAY.
FELLOW UNIVERSITY OF BOMBAY.

DAMODAR HALL,
PAREL,
BOMBAY, 12.

131

-2-

area to which I would have been entitled if the Trust had followed the usual practice and not imposed upon me the rule of leaving 20' of open space. Altogether, therefore, I am leaving a total area of 75/Sft. unbuilt area. In view of the fact that I am foregoing so much, I request that I may be allowed to appropriate an area mentioned in my proposals I, II & III above without the payment of an additional charge.

With respect to my proposal No. IV I beg to submit that the inside gallery in the library should not be treated as an additional floor and should be allowed free from the payment of any premium in view of the fact that it is only a book rack intended to provide sufficient space for storing books.

A set of sketch drawings showing the appropriation of extra area in red is attached herewith for your guidance.

Trusting that my application will be granted by the Trust,

I remain,
Yours faithfully,

B.R. Ambedkar

P.S. Any communication in connection with this application should be addressed to my architect Mr R. G. Chawla 27 Suryamahal Girgaum Bombay. 7th Nov. 32

7 NOV 1932

No ... 659/32-33
Executive Engineer for report after getting the plan ~~...~~ revised
H. ...
7/11/32

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेला लिहिलेले पत्र

'' मनुष्याच्या अंगी जितके नैतिक बळ अधिक असेल तितका त्याचा आत्मविश्वास वाढत जाऊन पराजयातूनही त्याला शेवटी सन्मानाचे यश मिळविता येते ''



भारतीय घटना समितीच्या सन्माननीय सदस्यांसमवेत घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद, पंडित जवाहरलाल नेहरु, वल्लभभाई पटेल व घटना मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर



२६ जानेवारी, १९५० पासून स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेचा अंमल सुरु झाला. प्रजासत्ताक भारताचे पहिले कायदेमंत्री म्हणून डॉ. बाबासाहेबांना राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी शपथ दिली. पंतप्रधान नेहरु शेजारी बसलेले (८ मे, १९५०).



१६ मे १९४९ रोजी दिल्लीच्या संसद भवनात घटना समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि समितीचे संयुक्त सचिव एस. एन. मुखर्जी व सदस्या बेगम ऐजाज रसूल चर्चा करताना.

'' आपल्या हितरक्षणकरिता रामबाण उपाय म्हणजे भावी स्वयंशासित भारताच्या कार्यकारी मंडळावर ताबा मिळविण्यातच उपाय आहे, असे दिसते आणि देशाच्या कायदेमंडळात पुरेसे प्रतिनिधीत्व प्राप्त करण्यानेच हे तुम्हाला साध्य होऊ शकेल ''



स्वतंत्र मजूर पक्षातर्फे ८ जानेवारी १९३९ रोजी मुंबईतील कामगार मैदानावर आयोजित केलेल्या समता सैनिक दलाच्या वार्षिक रॅलीचे छायाचित्र. या रॅलीत वीस हजार सैनिक सहभागी झाले होते. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मानवंदना देण्यात आली.



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या औरंगाबादच्या मिलिंद महाविद्यालयाच्या इमारती समोर काढलेल्या छायाचित्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसमवेत (डावीकडून) आर्किटेक्ट नार्वेकर, प्रि. म. भि. चिटणीस, माई आंबेडकर, रावबहादूर सी. के. बोले, कमलाकर चित्रे आणि बी. एच. वराळे.

'' सार्वत्रिक शिक्षणाचा प्रश्न हा तुटक तुटक रीतीने सोडविण्याचा प्रश्न नव्हे.
तो एकसूत्री धोरणानेच सोडविण्यात आला पाहिजे ''



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मजूरमंत्री पदाची जबाबदारी २७ जुलै १९४२ रोजी स्वीकारल्यानंतर लगेचच ७ व ८ ऑगस्ट १९४२ रोजी त्यांच्या अध्यक्षतेखाली मालक, कामगार व सरकार यांचे प्रतिनिधी असलेली त्रिपक्षीय मजूर परिषद दिल्ली येथे भरली. व्ही. व्ही. गिरी, ना. म. जोशी, जमनादास मेहता आदी कामगार नेत्यांनी परिषदेत भाग घेतला. यावेळी 'नीड फॉर युनिफॉर्मिटी इन लेबर लेजिस्लेशन' या विषयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषण करताना.



४ जानेवारी १९५४ रोजी आचार्य अत्रे निर्मित व दिग्दर्शित 'महात्मा फुले' चित्रपटाचा मुहूर्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हस्ते मुंबईतील फेमस स्टुडिओत झाला. त्याप्रसंगीच्या छायाचित्रात आचार्य अत्रे भाषण करताना, समवेत (डावीकडून) कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, माई आंबेडकर, महात्मा फुले यांच्या भूमिकेतील बाबूराव पेंढारकर व मागे डाव्या कोपऱ्यात शाहीर अमर शेख उभे आहेत.

'' हक्कासाठी आपला झगडा पुढे चालू ठेवणे आवश्यकच आहे आणि याकरिता आपले आपसातले मतभेद अंतस्थ कलह विसरुन जाऊन एकजुटीने संघटीतपणे आपले ध्येय गाठण्याचा प्रयत्न करणे हेच आपले आजचे कार्य होय.''



बौद्ध धम्माची दीक्षा घेतल्यानंतर लगेचच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उपस्थित असलेल्या आपल्या लाखो अनुयायांना स्वहस्ते धम्म दीक्षा देऊन स्वतः तयार केलेल्या २२ प्रतिज्ञा वदवून घेतल्या.



पुणे जिल्हा लोकल बोर्डातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा १८ जानेवारी १९४३ रोजी आर. जी. खंडाळे यांच्या पुढाकाराने सत्कार झाला. त्याप्रसंगीच्या छायाचित्रात डॉ. आंबेडकरांसोबत त्यांच्या उजवीकडे पुणे जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष अ. गो. आवटे व डावीकडे सदस्य आर. जी. खंडाळे आणि इतर.

 '' समाजक्रांती शांततेने घडू देण्याची जबाबदारी आमच्यापेक्षा आमच्या प्रतिपक्षावर जास्त प्रमाणात आहे ''



औरंगाबाद येथील न्यायालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर. औरंगाबादच्या बार असोसिएशनने त्यांना निमंत्रित केले होते (२८ जुलै १९५०)



नागपूर येथे भरलेल्या ऑल इंडिया डिप्रेस्ड क्लासेस कॉन्फरन्स दरम्यान प्रमुख कार्यकर्ते व अनुयायांसह डॉ. बाबासाहेब आंबेडकर याच परिषदेत एका ठरावान्वये 'दि ऑल इंडिया शेड्युल कास्टस् फेडरेशन' ची स्थापना करण्यात आली (जुलै १९४२)

'' तुम्ही दुसऱ्यांचे गुलाम म्हणून किती दिवस राहणार ? आजची परिस्थिती तुमच्या स्वाभिमानास पोषक आहे का ? स्वाभिमानरहित गुलाम आपली स्वतःची किंवा देशाची कधीतरी उन्नती करु शकला आहे का ? या प्रश्नांचा तुम्ही नीट विचार करा ''

## धम्मदीक्षा घेतल्यानंतर 'मी बौद्ध धम्मच का स्वीकारला ?' याचे जाहीर सभेत सविस्तर विवेचन करीत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर



ऑक्टोबर १९३५ मध्ये येवला येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मी अस्पृश्य हिंदू म्हणून जन्माला आलो पण हिंदू म्हणून मरणार नाही. अशी शपथ घेतली आणि १४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नागपूर येथे औपचारिकरीत्या बौद्ध धर्माचा स्वीकार लाखो अनुयायांसमवेत केला. तलवार किंवा बंदुकीच्या धाकाशिवाय आणि धनसंपत्तीचे कोणतेही अमिष दाखविल्याशिवाय एवढ्या मोठ्या प्रमाणावर धर्मांतर झाल्याचे दुसरे उदाहरण जगाच्या इतिहासात सापडणार नाही.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बावीस प्रतिज्ञा

- मी ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांना देव मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.
- मी राम व कृष्ण यांना देव मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.
- मी गौरी-गणपती इत्यादी हिंदू धर्मातील कोणत्याही देवदेवतेस मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.
- देवाने अवतार घेतले यावर माझा विश्वास नाही.
- बुद्ध हा विष्णूचा अवतार आहे हा खोटा आणि खोडसाळ प्रचार होय, असे मी मानतो.
- मी श्राद्धपक्ष करणार नाही; पिंडदान करणार नाही.
- बौद्ध धम्माच्या विरुद्ध विसंगत असे कोणतेच आचार कर्म मी करणार नाही.
- कोणतेही क्रियाकर्म ब्राह्मणांच्या हातून करवून घेणार नाही.
- सर्व मनुष्यमात्र समान आहेत, असे मी मानतो.
- मी समता स्थापन करण्याचा प्रयत्न करीन.
- मी भगवान बुद्धाने सांगितलेल्या अष्टांग मार्गाचा अवलंब करीन.
- मी भगवान बुद्धाने सांगितलेल्या दहा पारमिता पाळीन.
- मी सर्व प्राणिमात्रावर दया करीन, त्यांचे लालनपालन करीन.
- मी चोरी करणार नाही.
- मी खोटे बोलणार नाही.
- मी व्यभिचार करणार नाही.
- मी दारु पिणार नाही.
- मी प्रज्ञा, शील आणि करुणा या बौद्ध धम्माच्या तीन तत्त्वांची सांगड घालून माझे जीवन चालविन.
- माझ्या जुन्या मनुष्यमात्राच्या उत्कर्षाला हानिकारक असणाऱ्या आणि मनुष्यमात्राला असमान व नीच मानणाऱ्या हिंदू धर्माचा मी त्याग करतो व बुद्धाच्या धम्माचा स्वीकार करतो.
- बुद्ध धम्म हा सधम्म आहे, अशी माझी खात्री पटलेली आहे.
- माझा नवा जन्म होत आहे, असे मी मानतो.
- इत:पर मी बुद्धाच्या शिकवणीप्रमाणे वागेन, अशी प्रतिज्ञा करतो.

# महापरिनिर्वाण दिनी अनुयायांना जाहीर आवाहन

- महापरिनिर्वाणदिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करताना आपापल्या घरुन अभिवादन करता यावे, यासाठी चैत्यभूमी येथून समाज-माध्यमांद्वारे ऑनलाईन थेट प्रक्षेपण सुविधा पुढील लिंकवर उपलब्ध
  १. https://bit.ly/6december2022YT २. https://bit.ly/6december2022FB
  ३. https://bit.ly/6december2022TT
- महापरिनिर्वाण दिन हा सर्वांनी गांभीर्यपूर्वक पाळावा.
- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या विचारांचे चिंतन आणि अनुकरण करावे.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करताना सदाचारी जीवन जगण्याचा संकल्प करावा.
- महानगरपालिका, पोलीस दल आणि समता सैनिक दल कार्यकर्ते यांच्या सुचनांचे अनुयायांनी पालन करावे.
- अनुयायांनी भगवान बुद्धांच्या शांततेचा मार्ग अवलंबून सामुदायिक वंदना घ्यावी. त्यावेळी शांतता पाळावी व इतरांना शांत रहावयास सांगावे.
- या दिनी भगवान बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी संबंधित साहित्य, पुस्तके, सीडी, धम्मध्वज, बिल्ले तसेच विज्ञानवादी विचारांवर आधारित धम्म दिनदर्शिका / पुस्तके विकत घ्यावीत. ती वाचावीत व इतरांना वाचायला द्यावीत!
- या दिनी कोणत्याही प्रकारचे वाद्य वाजवू नये, घोषणा देऊ नये.
- बेवारस वस्तुंना स्पर्श करु नये व सदर बाबतीत त्वरित पोलिसांना कळवावे.
- अंधश्रद्धा तसेच अफवा पसरवणाऱ्यांपासून सावध रहावे.
- घातपाती कृत्ये / दुर्घटना टाळण्यासाठी प्रत्येक अनुयायाने जागृत पोलिसांसारखी दक्षता बाळगावी. संशयित व्यक्ती, वस्तू आढळल्यास त्यांच्यावर पाळत ठेऊन तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा किंवा मदतीसाठी १०० क्रमांकावर संपर्क साधावा.
- कोणत्याही प्रकारच्या मदतीकरीता पोलीस नियंत्रण कक्ष, महानगरपालिका कक्ष तसेच कार्यकर्ते / समन्वयक यांच्याशी संपर्क साधावा.
- रहदारीच्या मार्गांमध्ये घोळक्याने उभे राहून नागरिकांना अडथळा करु नये.
- समुद्रात जाऊ नये.
- चैत्यभूमी, छत्रपती शिवाजी महाराज मैदान आणि अनुयायांचा वावर असलेले सर्व परिसर स्वच्छ राखावे. महानगरपालिकेने उपलब्ध करुन दिलेल्या कचरा कुंडीतच कचरा टाकावा.
- महानगरपालिकेने उपलब्ध करुन दिलेले पिण्याचे / वापराचे पाणी वाया जाणार नाही, याची दक्षता घ्यावी.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे, त्यागाचे स्मरण करणे आणि त्यांचे अनुकरण करणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.**

# पददलितांचे स्फूर्तिस्थान : आचार्य दोंदे



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे दिल्लीमध्ये निधन झाले. अखिल भारताला जबर धक्का बसला. पाच कोटी अस्पृश्यांवर आकाशाची कृऱ्हाड कोसळली. डॉ. बाबासाहेब निर्वाणप्रत गेले. भगवान बुद्ध अडीच हजार वर्षांपूर्वी निर्वाणप्रत गेले. सर्व जग आज वंदना करीत आहे.

डॉ. बाबासाहेब खरे देशभक्त होते. घटना समितीमधील त्यांची भाषणें, गोलमेज परिषदेमधील त्यांची भाषणें, त्यांच्या देशभक्तीची साक्ष देत आहेत. घटनेवरील त्यांचे शेवटचे भाषण, ''स्वातंत्र्यामुळे आपल्याला निःसंशय आनंद झाला आहे. पण स्वातंत्र्याने आपल्यावर फार मोठमोठ्या जबाबदाऱ्या टाकल्या आहेत हे आपण विसरता कामा नये. देशात काहीही बिघडले, की ब्रिटिशांमुळे असे झाले अशी सबब यापुढे आपल्याला सांगता येणार नाही. आता जर काही घोटाळा झाला तर त्यांची जबाबदारी सर्वस्वी आपल्यावरच येणार आहे. सर्व जगामध्ये आणि या देशामध्येही नवीन विचारांचा उदय होत आहे. 'लोकांनी राज्य करावे' या कल्पनेचा लोकांना आता कंटाळा येऊ लागला आहे. 'लोकांसाठी राज्य' असले म्हणजे झाले मग ते 'लोकांचे आणि लोकांनी केलेले राज्य' असो व नसो. अशा लोकांच्या मनाची आता तयारी होऊ लागली आहे. 'राज्य हे लोकांचे, लोकांसाठी आणि लोकांनी केलेले असावे' या तत्त्वावर आपण ही घटना उभारली आहे. ती जर टिकावी अशी आपली इच्छा असेल तर लोकांनी केलेल्या राज्यापेक्षा लोकांसाठी केलेले राज्य बरे असे ज्या घातुक परिस्थितीमुळे जनतेला वाटू लागले आहे, त्या परिस्थितीकडे लक्ष देण्याच्या कामी आपण दिरंगाई करता कामा नये. एवढेच नव्हे तर ती परिस्थिती नष्ट करण्याच्या कामी आपण धैर्याने पुढे पाऊल टाकले पाहिजे. देशाची सेवा करण्याचा हा एकच मार्ग आहे. यापेक्षा अधिक चांगला मार्ग मला तरी माहित नाही.''

एके ठिकाणी त्यांनी तरुणांना संदेश पाठवला. '' We must be determined to defend independence with the last drop our blood. ''

भारतातील महान व्यक्ती आज निजधामास गेली. बुद्धरुप झाली. भारत शोकाकुल झाला. अस्पृश्य समाज, शोकसागरात बुडून गेला. कोणी कोणाची समजूत घालायची.

डॉ. आंबेडकर रागीट होते. परंतु, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री म्हणतात, आंबेडकरांचा संताप रास्त होता. त्याबद्दल न्यायी मनुष्य त्यांना दोष देऊ शकत नाही. बाबासाहेब म्हणजे महान् चारित्रवान व्यक्ती. अर्थशास्त्रज्ञ, शासनशास्त्रज्ञ, धर्मशास्त्रज्ञ, इतिहासाचे विद्वान अभ्यासक, बुद्धिमान् कायदेपंडित, आधुनिक स्मृतिकार, अनेक भाषांवर प्रभुत्व असलेला प्रभावी वक्ता, संशोधक ग्रंथकार, निधड्या छातीचा व मनोधैर्याचा समाज मार्गदर्शक, फुले, रानडे, आगरकर, टिळक, भांडारकर, गोखले या परंपरेतला त्यागी, बुद्धिमान, चारित्र्यवान लोकनेता निर्वाणाप्रत गेला. विनम्रभावे या भगवान बुद्धाच्या अवतार कार्यांचा संदेश सर्व जगात पसरविणारा व पददलितांचे स्फूर्ति आणि आशास्थान असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विनम्रभावे ही आम्हा सर्वांची श्रद्धांजली.

( गुरुवार दि. ६-१२-१९५६ रोजी रात्रौ नभोवाणीवर वाहिलेली श्रद्धांजलि,
प्रबुद्ध भारत :'डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण विशेषांक'-१९५७ वरून साभार)

# महामानवाचे महापरिनिर्वाण



६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाण झाल्यानंतर ७ डिसेंबरला त्यांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी लाखो लोक मूकपणे दहा तास रांगेत उभे होते. साऱ्या मुंबई महानगरीवर दुःखाची छाया पसरली होती. दुपारी दीड वाजता राजगृहावरुन अंत्ययात्रा निघाली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग (तेव्हाचा व्हिसेंट रोड), एल्फिन्स्टन पूल, सयानी मार्ग, गोखले मार्ग या रस्त्यांनी ती दोन-तीन मैल लांबीची अंत्ययात्रा सात तासानंतर हळूहळू छत्रपती शिवाजी महाराज मैदान (तेव्हाचे शिवाजी पार्क) जवळच्या स्मशानभूमीवर येऊन पोहोचली. साश्रू नयनांनी 'बाबासाहेब अमर रहे' च्या घोषणा देत अथांग जनसागर या महामानवाला अखेरचा निरोप देतांना शोकाकुल झाला होता.



'' हिंदू समाज दुसऱ्यांचा दास किंवा गुलाम होऊनच का राहिला याचा विचार केल्यास, तो आपल्या उद्धारासाठी 'ईश्वराची वाट' पाहत बसला हेच त्याला कारण आहे ''



चैत्यभूमी (दादर) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अर्धपुतळा.



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६५ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकास अभिवादन करताना महाराष्ट्राचे मा. राज्यपाल श्री. भगतसिंह कोश्यारी, तत्कालीन मा. उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार, तत्कालीन मा. गृहमंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील, तत्कालीन मा. राज्यमंत्री श्री. संजय बनसोडे, तत्कालीन मा. महापौर श्रीमती किशोरी किशोर पेडणेकर, तत्कालीन मा. सभागृह नेत्या श्रीमती विशाखा राऊत व मान्यवर.

# त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर स्मृती व्हीवींग डेक

## चैत्यभूमी दादर






" मागील पिढीचे हातून जी गोष्ट घडली नाही, ती गोष्ट घडवून आणणे हे या पिढीचे कर्तव्यकर्म आहे.
त्यास जर या पिढीतील लोक जागणार नाहीत तर ते कुलवंत नसून, कुलांगार आहेत असेच म्हणावे लागेल "

## ■ बृहन्मुंबई महानगरपालिकेचे महत्त्वाचे दूरध्वनी क्रमांक

| व्यवस्था | दूरध्वनी |
|---|---|
| म.न.पा. नियंत्रण कक्ष | १९१६ |
| आपत्कालीन व्यवस्थापन | २२६९ ४७२५-२७ |
| म.न.पा. अग्निशमन दल (भायखळा) | १०१ आणि २३०७ ६१११ |
| म.न.पा. अग्निशमन दल (वडाळा) | २४१३ २०६०-६२, २४१३२०५८ |
| घनकचरा व्यवस्थापन नियंत्रण कक्ष (शहर) | २४९३ ५६८९ |
| महानगरपालिका आयुक्त | २२६२ ०५२५ |
| अति. म.न.पा. आयुक्त (पूर्व उपनगरे) | २२६२ ०८०९ |
| अति. म.न.पा. आयुक्त (पश्चिम उपनगरे) | २२६२ ०४३३ |
| अति. म.न.पा. आयुक्त (प्रकल्प) | २२६२ ३००४ |
| अति. म.न.पा. आयुक्त (शहर) | २२६२ ०१४९ |
| उप आयुक्त (परिमंडळ - २) | २४१५ ०४०० |
| सहाय्यक आयुक्त -'जी उत्तर' विभाग | २४३९ ७८०० (वै.), २४३० ०५१३ |
| जनसंपर्क अधिकारी | २२७५ ४०२५ |

## ■ इतर महत्त्वाचे दूरध्वनी क्रमांक

| | |
|---|---|
| मंत्रालय (नियंत्रण कक्ष) | २२०२ ७९९०/२२०२ ४२४३ |
| मुंबई पोलीस नियंत्रण कक्ष | १०० आणि २२६२ ५०२० |
| पोलिस उप आयुक्त (परिमंडळ - ५) | २४८८ ८४२१/२४९२ ७३०८ |
| वाहतूक पोलिस | २४९३ ७७५५ |
| बेस्ट वाहतूक नियंत्रण कक्ष (वडाळा) | २४१४ ३६११ किंवा २४१४ ६५३३ |
| बेस्ट वाहतूक 'टोल फ्री' क्रमांक | १८०० २२७५५० |
| विद्युत पुरवठा (बेस्ट) (दादर नियंत्रण कक्ष-उत्तर) | २४१४ ४८९७ व २४१४ ५८८८ |
| नागरी सुरक्षा दल | २२८४ ३६६७ |
| गृहरक्षक दल(होमगार्ड) मुख्यालय | २२८४ २४२३ |
| पश्चिम रेल्वे (चर्चगेट) | २२०८ ४२८७ |
| पश्चिम रेल्वे (मुंबई सेंट्रल) | २३०७ ०५६४ |
| मध्य रेल्वे नियंत्रण कक्ष | २२६२ ०३७७ |
| दूरदर्शन | २४९६ ५८०० |
| आकाशवाणी | २२०२ ६२४२ |
| दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया (चैत्यभूमी) | २४१८ ५५९७/९८६७० ८७२५१ |
| पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे डॉ. आंबेडकर महाविद्यालय (वाणिज्य आणि अर्थशास्त्र), (वडाळा) मुंबई. | २४१२ २३९६/२४१६ ३३०० |
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समिती | ९८२०५ २१५४४ / ९८१९४ ९०८६८ |

" एखादा समाज बहुजन समाज आहे. एवढ्यावरच भागणार नाही तर तो जागृत, सुशिक्षित, स्वाभिमानी असेल तरच त्याचे सामर्थ्य वाढेल "

## चैत्यभूमी (दादर) येथील प्रवेशद्वार व भिमज्योत



‘‘ शासक वर्ग जबाबदार असावा असे तुम्हास वाटत असेल तर कायदे मंडळ खऱ्या अर्थाने आणि पूर्णतः प्रातिनिधीक असले पाहिजे’’

# बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने महापरिनिर्वाण दिनी दरवर्षी दिल्या जाणाऱ्या नागरी सेवा-सुविधा व संबंधित माहिती




डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त माहिती पुस्तिकेचे प्रकाशन (६ डिसेंबर २०२१)




छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथे मोफत वैद्यकीय सेवा-सुविधा



१ लाख चौरस फूट क्षेत्रफळाच्या मंडपात तात्पुरता निवारा



'शॉवर' असलेल्या स्नानगृहांची व्यवस्था

(संग्रहीत छायाचित्रे : दिनांक ६ डिसेंबर २०१९ व २०२०)

## दिनांक ०४ डिसेंबर ते ०७ डिसेंबर २०२२ पर्यंतचे भरती व ओहोटीचे वेळापत्रक

| रविवार दि. ०४.१२.२०२२ | | |
|---|---|---|
| | वेळ | उंची |
| ओहोटी | मध्य रात्री ०२:५३ | १.९६ मी. |
| भरती | सकाळी ०८:५६ | ३.७८ मी. |
| ओहोटी | दुपारी ०३:३० | ०.९९ मी. |
| भरती | रात्री १०:१३ | ४.१० मी. |

| सोमवार दि. ०५.१२.२०२२ | | |
|---|---|---|
| | वेळ | उंची |
| ओहोटी | मध्य रात्री ०३:४९ | १.९५ मी. |
| भरती | सकाळी ०९:४५ | ३.७५ मी. |
| ओहोटी | दुपारी ०४:१२ | ०.८० मी. |
| भरती | रात्री १०:५५ | ४.३२ मी. |

| मंगळवार दि. ०६.१२.२०२२ | | |
|---|---|---|
| | वेळ | उंची |
| ओहोटी | पहाटे ०४:४१ | १.९३ मी. |
| भरती | सकाळी १०:२९ | ३.७२ मी. |
| ओहोटी | दुपारी ०४:४९ | ०.६८ मी. |
| भरती | रात्री ११:३४ | ४.४५ मी. |

| बुधवार दि. ०७.१२.२०२२ | | |
|---|---|---|
| | वेळ | उंची |
| ओहोटी | पहाटे ०५:२७ | १.९२ मी. |
| भरती | सकाळी ११:०९ | ३.७०मी. |
| ओहोटी | सायंकाळी ०५:२१ | ०.६४ मी. |

आपल्या लहान मुलांची व वृद्धांची काळजी घ्यावी. रांगेने व शिस्तबद्धरित्या चैत्यभूमीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाचे दर्शन घ्यावे. आपत्कालीन परिस्थितीत अनुयायांनी सैरावैरा न पळता परिस्थितीचा अंदाज घ्यावा. तसेच पोलीस, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याद्वारे दिल्या जाणाऱ्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.



# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर :

## भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार




- महानगरपालिका नियंत्रण कक्ष
- तात्पुरत्या निवाऱ्यासाठी मंडपाची व्यवस्था
- अभिवादन रांग
- बाहेर जाण्याचा मार्ग
- वैद्यकिय कक्षाकडे जाण्याचा मार्ग
- शिवाजी पार्क मैदानामध्ये अनुयायांकरिता १८ युनिटची (१८०) फिरती शौचालये व रांगेतील अनुयायांसाठी ०४ युनिटची (४०) फिरती शौचालये
- २०० स्नानगृहे
- निरीक्षण मनोरे (वॉच टॉवर्स)
- वैद्यकीय कक्ष
- माननीय भंतेजी निवास व्यवस्था
- रूग्णवाहिका
- पिण्याच्या पाण्याची व्यवस्था (टँकर)
- पोलिस नियंत्रण कक्ष
- अन्न वाटपाची व्यवस्था
- पुस्तके, धार्मिक साहित्य विक्रेता विभाग
- कॅसेट्स, सीडीज, विक्रेता विभाग
- विद्युत खांब
- तात्पुरते अग्निशमन केंद्र
- जीवरक्षक बोटीची व्यवस्था
- तात्पुरती शौचालये
- पाण्याची सुविधा
- दादर रेल्वे स्थानकापासून चैत्यभूमीकडे जाण्याचा मार्ग
- माहिती कक्ष
- श्रीमान बाळासाहेब ठाकरे स्मृती स्थळ
- प्लाझा सिनेमा






" मनुष्य विद्वान झाला की, तो समाजाला उपयुक्त होतोच असे नाही.
विद्वान मनुष्य लुच्चा, लबाड, उसण्या, लटपट्या आणखी वाटेल त्या दुर्गुणांचा असतो "

# छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथील ६ डिसेंबर २०२२ रोजीची प्रस्तावित व्यवस्था




“ आपल्या पूर्वजांनी रणांगणात आपल्या मनगटातील जोर समशेरीच्या तडाख्यांनी सिद्ध केलेला आहे;
आता आपण आपल्या बुद्धिवैभवाने आजच्या सामाजिक दंगलीत आपली श्रेष्ठ जागा पटकाविली पाहिजे ”!



‘‘ दैवावर भरवसा ठेवून वागू नका. जे काय करायचे असेल ते आपल्या मनगटाच्या जोरावर करा ’’




डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मुंबईतील निवासस्थान ‘राजगृह’, हिंदू कॉलनी, दादर



नागरी सेवासुविधांच्या अविरत सेवेत

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## मुंबईचं नवं

# विकास पर्व



त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर स्मृती व्हीवींग डेक, चैत्यभूमी, दादर




सुविधा केंद्र, धारावी



डॉ. रु. न. कूपर रुग्णालयाची अद्ययावत व सुशोभित इमारत



कोरा केंद्र पूल, बोरीवली




विद्युत वाहन चार्जिंग स्टेशन, हाजी अली



'कोस्टल रोड' बोगदा खणणारे 'मावळा' यंत्र



'एल्फिन्स्टन ब्रिज' सुशोभिकरण



सरदार वल्लभभाई पटेल तरणतलाव, कांदिवली




रेसकोर्स जवळील सायकल ट्रॅक



'वरळी सी फेस' सुशोभिकरण



व्हीवींग डेक, स्वराज्यभूमी (गिरगाव चौपाटी)



" आपण आधी उच्चप्रतीच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरविले पाहिजे "

# बृहन्मुंबई महानगरपालिका



# भारतरत्न
# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

## यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त कोटी कोटी अभिवादन !

महापरिनिर्वाण दिनी चैत्यभूमीचे प्रक्षेपण पाहण्यासाठी खाली दर्शविलेला
‘क्यू आर कोड’ किंवा ‘सोशल मीडिया लिंक’ यांचा कृपया उपयोग करावा.

| Youtube | Facebook | Twitter |
| --- | --- | --- |
| https://bit.ly/6december2022YT | https://bit.ly/6december2022FB | https://bit.ly/6december2022TT |

| रमाकांत बिरादार | आशीष शर्मा | डॉ. इ सिं चहल |
| --- | --- | --- |
| उप आयुक्त<br>(परिमंडळ २) | अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त<br>(शहर) | बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त<br>तथा प्रशासक |

https://portal.mcgm.gov.in @mybmc MyBmc my_bmc MyBMC My Mumbai 8999-22-8999

# आदर्श समाज कोणता !!

'जर तुम्हाला जात नको, तर तुमच्या दृष्टीने आदर्श समाज कोणता?' असा प्रश्न विचारला जाईल. तुम्ही मला विचाराल तर 'स्वातंत्र्य, समता व भ्रातृभाव (विश्वबंधुत्व) या तत्वत्रयींवर आधारलेली समाजरचना आदर्श होय;' असे माझे उत्तर आहे. विश्वबंधुत्वाला कोण बरे आक्षेप घेईल? मला तर कोणी आक्षेप घेईल, अशी कल्पनाही करवत नाही. आदर्श समाज हा लवचिक असायला हवा. समाजाच्या एका टोकाला होत असलेले परिवर्तन दुसऱ्या टोकापर्यंत पोहोचविण्यास तेथे वाव हवा. आदर्श समाजरचनेत विभिन्न गटांच्या सुखदु:खात प्रत्येक गट जाणीवपूर्वक सहभागी होतो. सामाजिक एकात्मता म्हणतात ती हीच. यालाच विश्वबंधुत्व म्हणतात. लोकशाही हे त्याचे दुसरे नाव आहे. लोकशाही हा काही निव्वळ राजसत्तेचा प्रकार नाही. लोकशाही ही प्रथम सामाजिक सहजीवनाची व्यवस्था आहे. समाजबांधवाबद्दल योग्य तो आदर व मानसन्मान राखण्याचा तो दृष्टिकोन आहे. स्वातंत्र्याला कोणाचा आक्षेप आहे काय? मुक्त मनाने स्वैर विहार करण्याच्या अथवा चरितार्थासाठी प्रयत्न करण्याच्या स्वातंत्र्यास सहसा कोणीही आक्षेप घेणार नाही. तसेच संपत्ती संकलन, चरितार्थाच्या साधनांचा वापर करुन आपली प्रकृती सुदृढ ठेवण्याचा माणसाचा अधिकार या अर्थानेही स्वातंत्र्यास कोणीही आक्षेप घेणार नाही. मग आपल्या शरीरातील सर्व शक्तींचा उपयोग करु देण्याचे माणसाला स्वातंत्र्य देण्यास काय हरकत आहे? अन्न, वस्त्र व निवाऱ्याचे माणसाला स्वातंत्र्य असावे, असे जातीयतेचे पुरस्कर्ते मान्यही करतील. परंतु व्यक्तीला आपल्या मनाप्रमाणे उद्योग करण्याचे स्वातंत्र्य देण्यास ते विरोध करतील. परंतु अशा प्रकारच्या स्वातंत्र्यास अडथळा आणणे म्हणजे गुलामी मनोवृत्तीस प्रोत्साहन देणे होय. गुलामगिरीचा, निव्वळ कायद्याद्वारे बंधनात जखडणे, असा अर्थ होत नाही. समाजातील काही व्यक्तींकडून इतरांद्वारे विशिष्ट कामे करुन घेण्यास भाग पाडण्यांत येते, त्यामुळे त्यांच्या वागणुकीवर बंधन पडते, अशा परिस्थितीला गुलामगिरी म्हणता येईल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
'जातीसंस्थेचे उच्चाटन' या ग्रंथातून
(मूळ ग्रंथः ॲनिहिलेशन ऑफ कास्ट / अनुवादः वसंत मून)


| श्री. रमाकांत बिरादार | श्री. आशीष शर्मा | डॉ. इ सिं चहल |
| --- | --- | --- |
| उप आयुक्त (परिमंडळ-२) | अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) | बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक |

**तानाजी कांबळे**, जनसंपर्क अधिकारी, यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय येथून प्रकाशित केले.

। **मुद्रक** : व्यवस्थापक, बृहन्मुंबई महानगरपालिका मुद्रणालय, मुंबई - ४०० ०११ ।

**(ही पुस्तिका मोफत आहे)**

NS3631PRO-BMPP-59575-2022-23-100,000-Booklet